**अतितात्काळ / कालमर्यादा**
क्र. पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१९/८०/२०१९.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई-४०० ००१.
दिनांक :-१२ /०४/२०१९.

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.३/२०१४, दिनांक ०१/०२/२०१४, व
२. महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०१५ दि.०६/०४/२०१५

**विषय** :- **सर्वसाधारण बदल्या - २०१९ :**
पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त / सहायक समादेशक (नि:शस्त्र / सशस्त्र / मोटार परिवहन / बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) / बिनतारी संदेश (वाहतुक) / श्वान अध्यापक / शस्त्र निरीक्षण इ.)

* * * * *

संदर्भाधिन अधिसूचनेमधील तरतुदींच्या अधिन राहून सन-२०१९ साठी पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या सर्व संवर्गातील अधिका-यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने :-

१. सध्याच्या नेमणुकीच्या पदात **दि. ३१/०५/२०१९ पर्यंत २ वर्षे पूर्ण करणार आहेत,** अशा पोलीस उपअधीक्षकांकडून बदलीकरिता त्यांच्या पसंतीच्या ठिकाणांची माहिती घेऊन सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन संबंधीत घटक प्रमुखांनी ती निश्चितपणे दि.२६/०४/२०१९ पुर्वी या कार्यालयास पाठवावी.
२. ज्या अधिकाऱ्यांना विनंतीवरुन मुदतपुर्व बदली हवी आहे, त्यांची स्वतंत्र यादी करुन ती सुध्दा दि.२६/०४/२०१९ पूर्वी या कार्यालयास पाठवावी.
३. अधिका-यांची माहिती प्रपत्रात भरतांना ती संबंधीतांच्या सेवापुस्तकांतील प्रमाणित नोंदींनुसार बरोबर असल्याची निश्चीत खात्री करावी.
४. मागील ५ वर्षाचे गोपनीय अभिलेखाची प्रतवारी नमूद करावी.
५. नमूद अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कलमान्वये गुन्हा दाखल असल्यास अथवा विभागीय चौकशी सुरु असल्यास ती बाब स्पष्टपणे नमूद करावी.
६. प्रत्येक अधिका-यासाठी प्रपत्राचे स्वतंत्र पृष्ठ वापरण्यात यावे.
७. बदलीकरिता पसंतीची ठिकाणे कळविताना खालील ठिकाणे वगळण्याविषयी संबंधीत अधिकाऱ्यांना कृपया सूचना द्याव्यात :

(i) घोषित मूळ जिल्हा

(ii) ज्या जिल्ह्यात त्यांची, अथवा त्यांच्या निकटच्या कुटुंबियांची स्थावर मालमत्ता, किंवा पारिवारिक व्यवसाय आहे,

(iii) जेथे त्यांची पूर्वी प्रचलित शासन नियमांनुसार सेवा पूर्ण झाली आहे,

८. तसेच, संबंधीतांना स्पष्ट कल्पना द्यावी की, पसंतीच्या ठिकाणी प्रशासकीयदृष्ट्या शक्य असेल तरच बदली करण्याकरिता दिलेल्या विकल्पांचा विचार करण्यात येईल.

(i) सार्वत्रिक बदल्या, २०१९ नंतर पुढील वर्षाच्या सर्वसाधारण बदल्यांपर्यंत अत्यंत अपवादात्मक परिस्थिती असल्याखेरीज **मुदतपूर्व विनंतीचा विचार केला जाणार नाही, ही बाब** संबंधीत पोलीस अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(ii) त्यानुसार बदलीसंदर्भात ज्यांचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत, असे अर्ज अर्जदारांनी विनंतीमध्ये नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत किंवा कसे, याबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करुन सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावेत.

९. ज्या पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाचे क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/२०१६, दि. ०७/१०/२०१६, व क्र. पोमंस/१४-अ/६७/एमएन/ ३२८/२०६, दि. ०८/११/२०१७ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबंधीत पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्तांच्या बदलीबाबत परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

१०. पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांविरुध्द न्यायालयीन प्रकरण / विभागीय चौकशी किंवा एखादे अन्य प्रकरण प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे, किंवा सध्या यापैकी कोणी एखादी शिक्षा भोगत असल्यास सदरची शिक्षा केव्हा सुरु झाली, व ती केव्हा संपणार, इत्यादींबाबतचा सविस्तर अहवाल सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावा.

११. सदरची माहिती DVBW-TTSurelh मध्येच टंकलिखित करुन, परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन, बिनचूक सेवातपशीलांची ही प्रत्येकी एक याप्रमाणे दिनांक २६/०४/२०१९ पर्यंत या कार्यालयातील का. क्र. २ मध्ये पाठवावी.

**१२.** पोलीस उप अधीक्षकांनी बदल्यांसंदर्भातील त्यांचे विनंती अर्ज त्यांच्या घटक प्रमुखांमार्फतीनेच ह्या कार्यालयात सादर करावेत, आणि घटक प्रमुखांनी देखील सदर अर्ज ह्या कार्यालयात सादर करतांना संबंधीत अधिकाऱ्याच्या बदल्यांसंदर्भात त्यांचे **स्पष्ट कार्यालयीन अभिप्राय, व त्यांचा सेवापुस्तकातील अधिकृत अणि अचूक संपूर्ण सेवातपशील** न चुकता पाठवावा.

१३. घटक प्रमुखांना अशीही विनंती करण्यात येते की, आयुक्तालयांतर्गत सहायक पोलीस आयुक्तांच्या बदल्या परस्पर करु नयेत. अशा बदल्या केल्यास पुढे काही न्यायालयीन बाबी निर्माण झाल्या तर त्याची संपूर्णत: जबाबदारी संबंधीत घटकप्रमुखांची राहील, याची देखील संबंधीत घटकप्रमुखांनी काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, मुंबई /लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल, मुंबई/ वाहतूक, मुंबई /दहशतवाद विरोधी पथक, मुंबई / कारागृह महानिरीक्षक, कार्यालय, पुणे
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/ महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / वि.सु.वि., दादर, मुंबई / फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती / गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अक्षीक्षक (लोहमार्ग / विसुवि, दादर सह )
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये./ अ.अ.प्र.क्रे., नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण विद्यालय, नाशिक
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित :-

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / नंदूरबार/ गडचिरोली /अमरावती / नागपूर
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदरचे परिपत्रकीय व ज्ञापन *http://www.mahapolice.gov.in* या संकेतस्थळावर पुढील ३० दिवसांसाठी **FLASH** या शिर्षाखाली सत्वर प्रसिद्ध करावेत.

GT२०१७

## पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील अधिका-यांच्या सर्वसाधारण बदल्या -२०१९

१)नांव :-

२) सध्याची नेमणूक व दिनांक :-

३) घटक :-

४) प्रवर्ग :- (खुला/ इ.मा.व/अ.जाती/अ.जमाती / वि.जा-(अ) / भ.ज-(ब) / भ.ज-(क) / भ.ज-(ड) / वि.मा.प्र.)

५) घोषित मूळ जिल्हा :-

६) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

७-१) नेमणुकीचा प्रकार : सरळसेवा / खात्यांतर्गत सरळसेवा/ स्थानापन्न

७-२) पोलीस उपअधीक्षकपदी नेमणुकीची तारीख

| ८) पूर्वीच्या नेमणुका<br>(परिपूर्ण व अचूक) | | | ९) पसंतीची तीन ठिकाणे व<br>विनंती अर्जाची माहिती | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| <u>पोलीस उप निरीक्षक</u><br><br><u>सहायक पोलीस निरीक्षक</u><br><br><u>पोलीस निरीक्षक</u><br><br><u>पो उप अ/ सहा पो आ</u><br><br>** कोणतीही प्राथमिक/ विभागीय चौकशी अथवा शिक्षा प्रलंबित/ प्रस्तावित अथवा चालू आहे काय?<br>(असल्यास तपशील द्यावा.)<br><br>* विशेष शाखा नेमणुका गणण्यात याव्यात. वि.शा. बाबतच्या नोंदी Bold Font ने दाखवाव्यात<br><br>* मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |